No. 14573
दिनांक : 20 DEC 2018

महानिर्मिती

## जाहिरात क्र. ०१ (जाने)/२०१७ अंतर्गत "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाकरीता कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहण्याबाबत.

## अधिसूचना

**संदर्भ :** १. महानिर्मिती जाहिरात क्र. ०१ (जाने)/२०१७
२. महानिर्मिती कंपनी अधिसूचना दि. २८.११.२०१८.
३. महानिर्मिती कंपनी अधिसूचना दि. ३०.११.२०१८.
४. महानिर्मिती कंपनी अधिसूचना दि. २०.१२.२०१८.

---

उपरोक्त विषयास अनुसरुन महानिर्मिती जाहिरात क्र. ०१(जाने)/२०१७ अन्वये "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) पदे सरळसेवेने भरणेबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने ऑनलाईन परीक्षा व वैयक्तिक मुलाखतीत प्राप्त गुणांनुसार कागदपत्रे पडताळणीसाठी तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी दि.२७.०७.२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

ऑनलाईन परीक्षेतील प्राप्त गुणांची सुधारीत यादी संदर्भिय क्र. ०२ वरील अधिसूचनेनुसार प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदरील संदर्भिय अधिसूचना क्र. २ ते ४ च्या अनुषंगाने खालील नमूद उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया दि.२९.१२.२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आलेली आहे.

**प्रवर्ग - खुला (Open)**

| अनु क्र. | परीक्षार्थी क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ११०२१११५५२८ | श्री.वानकर कुणाल गुरुदास | इमाव | खुला |
| २ | ११०२१११५२६१ | श्री.मंगेश नानासाहेब झाडे | इमाव | खुला |
| ३ | ११०२११२६६०६ | श्री.नेताजी पोपट माळी | इमाव | खुला |
| ४ | ११०२१११०९१८ | राजेश्वरी कुंडलिक म्हात्रे | इमाव | खुला-महिला |
| ५ | ११०२११०१९८८ | श्री.पडोळे निलेश सुरेशराव | खुला | खुला |
| ६ | ११०२११२९९५४ | श्री.मदन राजेंद्र बिरादर | खुला | खुला |
| ७ | ११०२११२५९९४ | तांबोली खुशबु युनुस | खुला | खुला महिला आरक्षण |
| ८ | ११०२११२९८८७ | श्री.बालाजी कदम | खुला | खुला खेळाडू आरक्षण |

**प्रवर्ग - अनुसूचित जाती (SC)**

| अनु क्र. | परीक्षार्थी क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ११०२१११५४२५ | श्री.सौरभ हरिभाऊ जंगले | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती |
| २ | ११०२१११०८४८ | श्री.विनायक संपत दुपाटे | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती |
| ३ | ११०२१११८०९० | श्रध्दा अभिमन्यू मेश्राम | अनुसूचीत जाती | अनुसूचीत जाती महिला आरक्षण |

**प्रवर्ग - विमुक्त जाती-अ (VJ-A)**

| अनु क्र. | परीक्षार्थी क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ११०२१११०१७८० | श्री.जाधव निलेश गोविंदा | वि.जा.-अ | वि.जा.-अ |
| २ | ११०२१११२५८८२ | श्री.जाधव अविनाश प्रकाश | वि.जा.-अ | वि.जा.-अ |
| ३ | ११०२११११५३९ | विभावरी किरण राठोड | वि.जा.-अ | वि.जा.-अ-महिला आरक्षण |
| ४ | ११०२१११२५८८७ | श्री.जयदीप विश्वनाथ राठोड | वि.जा.-अ | वि.जा.-अ |

**प्रवर्ग - भटक्या जमाती-क (NT-C)**

| अनु क्र. | परीक्षार्थी क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ११०२१११२५८६९ | श्री.डोंगरे संग्राम ज्ञानोबा | भ.ज.-क | भ.ज.-क |
| २ | ११०२१११२५८३८ | श्री.अतुल बालासाहेब कुलाल | भ.ज.-क | भ.ज.-क |

**प्रवर्ग - इतर मागास प्रवर्ग (OBC)**

| अनु क्र. | परीक्षार्थी क्रमांक | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीताचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | ११०२१११२६५७४ | श्री.ज्ञानेश्वर रमेश बावीस्कर | इमाव | इमाव |
| २ | ११०२१११२२२८८ | श्री.शिंदे सागर मधुकर | इमाव | इमाव |
| ३ | ११०२१११११५३२३ | श्री.प्रविण मुरलीधर केचे | इमाव | इमाव |
| ४ | ११०२११११६६२९ | रहांगदले दिपाली छबीलाल | इमाव | इमाव-महिला आरक्षण |
| ५ | ११०२११११७९३० | खोडे अश्विनी रामेश्वर | इमाव | इमाव-महिला आरक्षण |
| ६ | ११०२१११०१२५२ | बुरघाटे हर्षा विनोदराव | इमाव | इमाव-महिला आरक्षण |
| ७ | ११०२१११०४११८ | स्नेहल राजेश पाटील | इमाव | इमाव-महिला आरक्षण |

**टिप**: उपरोक्त तक्त्यात नमूद खुला प्रवर्गातंर्गत (Open) अनु.क्र.५ ते ८, अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातंर्गत अनु.क्र.३ व विमुक्त जाती-अ (VJ-A) या प्रवर्गातंर्गत अनु.क्र.४ वरील उमेदवारांनी त्यांची वैयक्तिक मुलाखत परीक्षा पार पाडून कागदपत्रे पडताळणीसाठी खालील नमूद ठिकाणी दि.२९.१२.२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता उपस्थित रहावे.

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,<br>प्रकाशगड, ६ वा मजला, अनंत काणेकर मार्ग,<br>वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

उपरोक्त कागदपत्र पडताळणीसाठी हजर होतेवेळी उमेदवारांनी खालील अटी व शर्तींचे /सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) उमेदवारांची कागदपत्रे पडताळणीसाठीची निवड ही उमेदवारांना प्राप्त झालेल्या एकुण गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव , वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण,मराठी भाषा येत असल्याचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून त्या बाबतचे मुळ प्रमाणपत्राची कागदपत्रे पडताळणीवेळी तपासणी करण्यात येईल.

२) उपरोक्त नमूद सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव , वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, खेळामधील प्राविण्य, माजी सैनिक, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, मराठी भाषा येत असल्याचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी सर्व मुळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) उपरोक्त नमूद सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी तसेच महिला उमेदवारांनी ज्यांचे नाव महिला आरक्षणातंर्गत (WR) नमुद करण्यात आलेले असेल (अनुसूचित जाती व जमाती हे प्रवर्ग वगळून) अशा उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन रिक्त पदांकरीता ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले असणे व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे. यापूर्वी कागदपत्रे पडताळणी दि.०४.०८.२०१७ रोजी झालेली असल्याने सदरील कागदपत्रे दि.०४.०८.२०१७ रोजी वैध असणे आवश्यक आहे.विहित नमुन्यात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र नसल्यास उमदेवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारच्या निवेदन व विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४) ज्या महिला उमेदवारांची निवड ही खुल्या प्रवर्गात महिला आरक्षणातंर्गत (WR) करण्यात आलेली असेल अशा महिला उमेदवारांनी शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५.०५.२००१ अन्वये खुल्या प्रवर्गातून महिला आरक्षणाकरीता लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या रिक्त पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे. यापूर्वी कागदपत्रे पडताळणी दि.०४.०८.२०१७ रोजी झालेली असल्याने सदरील कागदपत्रे दि.०४.०८.२०१७ रोजी वैध असणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र नसल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारच्या निवेदन व विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५) कागदपत्रे पडताळणी यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही.

६) "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या रिक्त पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

७) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे, कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist)या पदाकरीता ऑनलाईन पद्धतीने अर्ज करताना कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असणेआवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. यापूर्वीची कागदपत्र पडताळणी दि. ०४.०८.२०१७ रोजी झालेली असल्याने, सदरील कागदपत्रे दि.०४.०८.२०१७ रोजी वैध असणे आवश्यक आहे. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे,कागदपत्रे ही कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवार जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभव हा जाहिरातीस अनुसरुन "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाकरीता ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकास धारण करीत असणे आवश्यक आहे.

८) खेळाडू आरक्षणाअंतर्गत (SP) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्रे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. राक्रीधो.२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१.०७.२०१६ अन्वये तसेच वेळोवेळी झालेल्या शासन निर्णयातील सुधारणांच्या अनुषंगाने "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या संवर्गातील रिक्त पदांच्या निवडीकरीता वैध आहेत अथवा नाहीत याबाबतच्या अहवालाकरीता संबंधित उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविण्यात येतील. सदर उमेदवारांच्या खेळाडू प्रमाणपत्रांच्या वैधतेबाबतचा अहवाल संबंधित उप संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्याकडुन प्राप्त झाल्यानंतरच पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) "रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या रिक्त पदाकरीता मागास प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या स्वत:च्या नावे असलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे (Domicile Certificate) कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. यापूर्वीची कागदपत्र पडताळणी दि. ०४.०८.२०१७ रोजी झालेली असल्याने, सदरील कागदपत्रे दि. ०४.०८.२०१७ रोजी वैध असणे आवश्यक आहे. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे /कागदपत्रे ही कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१०) कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेला अर्ज, त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) स्वत:जवळ बाळगावा. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्र पडताळणीकरीता उपस्थित राहावे.

११) कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१२) जाहिरात क्र.०१(Jan)/२०१७ च्या भरती प्रक्रियेचा अभिलेख निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून तीन (३) महिन्याच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल. त्यापुढील काळात कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१३) मराठी भाषा येत असल्याचा पुराव्याचा नमुना प्राप्त करुन घेण्याकरीता उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक करावे. माध्यमिक / शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रीक किंवा विद्यापीठ उच्च परीक्षा संबंधी मराठी भाषा विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे दर्शविणारे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मंडळाचे किंवा सांविधिक विद्यापीठाचे प्रमाणपत्र धारण करीत असणाऱ्या उमेदवारांनी मराठी भाषा येत असल्याचा पुरावा म्हणुन सदरची प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

१४) कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी जे उमेदवार विहीत केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणार नाहीत त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारचे निवेदन व विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१५) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

"रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या रिक्त पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीकरीता जाहिरातीतील अटी व शर्तींची पुर्तता करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी असेल, याची सर्व उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

"रसायनशास्त्रज्ञ" (Chemist) या पदाच्या रिक्त पदाकरीता निवड करण्यात आलेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहताना त्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेला अर्ज, त्यांचे मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) घेऊन कागदपत्रे पडताळणीकरीता नमूद ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे. नमूद दिनांक व वेळेनंतर कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती

**Click Here for Download Marathi Performa**